२१

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade

अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

प्रेषक : प्र-संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

विषय :इतिवृत मान्यतेबाबत आणि विद्वत परिषदेमध्ये ठेवणेबाबत.
संदर्भ : खालीलप्रमाणे

प्रती : मा. कुलगुरू

दिनांक : 29/ 06/2024

संदर्भ: य.च.म.मु.वि./सभा व दप्तर कक्ष/2024/80 दि. 21.06.2024

महोदय,

वरील संदर्भीय पत्रानुसार सभा व दप्तर कक्षाने दिनांक 04.07.2024 रोजी झालेल्या विद्वत परिषद यांची बैठक आयोजित करण्यात आल्याचे कळविले आहे.

1) संदर्भीय पत्रानुसार स्कूल कॉन्सिल बैठक दिनांक 29.06.2024 बैठक 61 वी घेण्यात आली .या बैठकीचे इतिवृत मान्यतेसाठी पाठवित आहे.त्यास मान्यता द्यावी, ही विनंती.

2) स्कूल कॉन्सिल बैठक क्रंमाक 61 च्या इतिवृतास मान्यता मिळाल्यानंतर मान्यता दिलेल्या इतिवृतास दिनांक 04.07.2024 रोजी होणाऱ्या विद्वत परिषदेमध्ये ठेवण्यास मान्यता मिळावी,ही विनंती.

सोबत — इतिवृत बैठक क्रंमाक 61

मान्य

(प्रा. संजीवनी महाले)
संचालक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

मान्य / अमान्य 3/7/24

मा. कुलगुरू

मा. कुलगुरू कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC 1531
दि. 3 / 7 /2024

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

बैठक क्र. ६१, दिनांक. २९.०६.२०२४

**इतिवृत्त**

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. ६१ दि. २९.०६.२०२४ रोजी स. १०.०० ते ११.१० या वेळेत online व offline पद्धतीने घेण्यात आली. या बैठकीस विद्यापीठातील सदस्य प्रत्यक्ष आणि बहिस्थ सदस्य online पद्धतीने उपस्थित होते.

**प्रत्यक्ष उपस्थिती**

१. प्रा. संजीवनी महाले प्रोफेसर, अध्यक्ष व प्र.संचालक शिक्षणशास्त्र विद्शाखा
२. प्रा. चेतना कामळस्कर , संचालक, विज्ञान विद्याशाखा
३. श्रीमती. शुभांगी पाटील, सहायक प्राध्यापक, विद्यार्थी सेवा विभाग.
४. डॉ. दयाराम डी. पवार, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा.
५. डॉ. सुभाष सोनुने, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा.
६. डॉ. राजकुमार ननवरे, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार शिक्षणशास्त्र विद्याशाखा
७. प्रा. वर्षा बहिरम, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार शिक्षणशास्त्र विद्याशाखा
८. श्रीमती. स्नेहल मांजरेकर, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार शिक्षणशास्त्र विद्याशाखा
९. डॉ. साधना तांदळे, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार CDS.
१०. श्री. शिवानंद कहाळेकर, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार CDS.
११. श्री. ज्ञानेश्वर जाधव, निमंत्रित सदस्य, सहयोगी सल्लागार. CDS.

**दूरदृश्य प्रणाली (online)**

१. डॉ.भरतभाई जोशी, कुलगुरु, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद.
२. डॉ. चेतना सोनकांबळे, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
३. डॉ. निशा वळवी, सहयोगी प्राध्यापक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
४. डॉ. लतिका गायकवाड. सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विद्याशाखा.
५. डॉ. चंद्रकांत बाविस्कर, प्राध्यापक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

काही वैयक्तिक अडचणीमुळे खालील सदस्य बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.

१. प्रा. प्रविण घोडेस्वार, प्राध्यापक, विद्यार्थी सेवा विभाग.
२. डॉ. संजय चाकणे, पुणे. ( विद्वत परिषद सदस्य )
३. डॉ. अमृत भरवाड, वरिष्ठ प्राध्यापक, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद.
४. प्रा. विजयकुमार पाईकराव, सहयोगी प्राध्यापक शिक्षणशास्त्र विद्याशाखा (सचिव)

School Council Education

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद (School Council of Education)

## बैठक क्र. 61

**बैठक वृतांत :-**

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेची 2024 या वर्षातील द्वितीय शिक्षणशास्त्र विद्याशाखा बैठक . 61, दि. 29.06.2024 रोजी स. 10.00 ते ११.१० या वेळेत online आणि offline पध्दतीने आयोजित केली आहे. त्या बैठकीचे विषय पुढीलप्रमाणे -

| क्रमांक | विषय |
|---|---|
| 61. | **उपस्थित सदस्यांचे स्वागत** |
| 61. 1 | **विषय क्र. बी.-1 / एफ-180 / 2024/ 01**<br>बैठक क्र. 60 च्या परिषदेचे इतिवृत्त मान्यता<br>**(सहपत्र १)**<br>**निर्णय:-** बैठक क्र. 60 च्या परिषदेचे इतिवृत्त मान्यता देण्यात आली. |
| 61. 2 | **विषय क्र. बी.-1 / एफ-180/ 2024/ 02**<br>मागील सभेच्या कार्यवाही अहवालाची माहिती देणे<br>**(सहपत्र २)**<br>**निर्णय:-** मागील सभेच्या कार्यवाही अहवालाची माहिती देऊन मान्यताही देण्यात आली. |
| 61. 3 | **विषय क्र. बी.-1 / एफ-180/ 2024/ 03**<br>**विषय: पीएच.डी. शिक्षणक्रम सन २४-२५ यावर्ष पासून नियमित पद्धतीने सुरु करणे बाबत...**<br>**टिप्पणी** : UGC Public Notice No.F.4-1 (UGC-NET Review Committee)/2024(NET)/140648 March 27, 2024/) नियमानुसार शैक्षणिक वर्ष २४-२५ पासून नियमित पीएच.डी शिक्षणक्रम सुरु करण्यासाठी विद्यापीठाद्वारे मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आलेल्या आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखेत शिक्षणशास्त्र आणि दूर शिक्षण या दोन विषयातील संशोधन मार्गदर्शक उपलब्ध आहेत.<br>**विषय मान्यतेसाठी सादर:-** शिक्षणशास्त्र विद्याशाखेत सन २०२४ पासून पीएच.डी शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम आणि पीएच.डी दूर शिक्षण शिक्षणक्रम या दोन विषयात नियमित पद्धतीने पीएच.डी सुरु करण्यास चर्चा व मान्यतेसाठी सादर...<br>**(सहपत्र ३)**<br>**निर्णय:-** शिक्षणशास्त्र विद्याशाखेत सन २०२४ पासून पीएच.डी. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम आणि पीएच.डी दूर शिक्षण शिक्षणक्रम या दोन विषयात नियमित पद्धतीने पीएच.डी सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. |
| 61.4 | **विषय क्र. बी.-1 / एफ-180/ 2024/ 04 एम.ए.शिक्षणशास्त्र**<br>**उप विषय 61.4.1 NEP 2020 प्रमाणे एम.ए. शिक्षणशास्त्र M-83 शिक्षणक्रम संपर्क सत्र वेळापत्रकाबाबत...** |

School Council Education

**टिप्पणी :**NEP 2020 प्रमाणे पदव्युत्तर शिक्षणक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. एनईपी-२०२२/ . .०९/ विशि-३ शिकना दि. १६ मे २०२३ नुसार एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणकर्माची पुनरचना करण्यास आलेली आहे. त्यात अनेक वेगळ्या घटकांचा समावेश आहे. UGC च्या मुक्त विद्यापीठाच्या २०२० मार्गदर्शक तत्वांमध्ये ४ श्रेयांकासाठी १२ संमत्रण तासिका २ श्रेयांकासाठी ६ समंत्रण तासिका घेण्यास त्याचप्रमाणे ६० % ऑफलाईन आणि ४० % ऑनलाईन संमत्रण घेण्यास मान्यता दिलेली आहे. प्रत्येक सत्रात एकूण १२ दिवसांचे वेळापत्रक तयार करण्यास आलेले आहे. केंद्राने त्यांची व विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार त्याचे आयोजन करावयाचे आहे. सत्र ३ व सत्र ४ मधील संशोधन कार्याची मौखिक परीक्षा ऑनलाईन किंवा ऑफलाईन घेण्यात येईल. संशोधन अहवाल मौखिक परीक्षा ऑफलाईन घेतल्यास १३ दिवसांचा समावेश असेल.

**विषय मान्यतेसाठी सादर:** NEP 2020 प्रमाणे एम.ए. शिक्षणशास्त्र M – 83 सत्र १, सत्र २, सत्र ३, सत्र ४ संपर्कसत्राचे वेळापत्रक चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**(सहपत्र ४)**

**निर्णय:-** NEP 2020 प्रमाणे एम.ए.शिक्षणशास्त्र M – 83 चे सत्र १, सत्र २, सत्र ३, सत्र ४ संपर्कसत्राचे वेळापत्रकास मान्यता देण्यात आली.

**उप विषय 61.4.2** NEP 2020 नुसार एम.ए.शिक्षणशास्त्र M83 शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्र व्यवस्थापन खर्च आर्थिक प्रस्ताव मान्यतेबाबत..

**टिप्पणी:** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे NEP 2020 नुसार एम.ए.शिक्षणशास्त्र M83 शिक्षणक्रम २०२३ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात आलेला आहे. त्यातील कृतींमध्ये अनेकविध बदल आहेत.विद्यापीठाने दि. ११ ऑक्टोबर २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठक क्रमांक १६७ मध्ये विषय क्र. १६७.४.१.(ट) नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे दि. ३०/०३/२०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मानधन दर विचारात घेऊन आणि अध्ययनार्थी निहाय अभ्यासकेंद्र शुल्क रकमेनुसार मानधन निश्चित करण्यात आलेले आहे.अध्ययनार्थी कडून घेण्यात येणारी अभ्यासकेंद्र शुल्क कमी असल्यामुळे त्या त्या प्रमाणे हे मानधन दर कमी करण्यात आलेले आहेत.

**विषय मान्यतेसाठी सादर:** NEP 2020 नुसार एम.ए. शिक्षणशास्त्र M83 शिक्षणक्रमाच्या सन २०२३-२०२५ या तुकडी पासून अभ्यासकेंद्र व्यवस्थापन आर्थिक खर्च चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**(सहपत्र ५)**

**निर्णय:-** NEP 2020 नुसार एम.ए. शिक्षणशास्त्र M83 शिक्षणक्रमाच्या सन २०२३-२०२५ या तुकडी पासून अभ्यासकेंद्र व्यवस्थापन आर्थिक खर्च विभाजनास मान्यता देण्यात आली.

**उप विषय 61.4.3 एम.ए. शिक्षणशास्त्र M- 83 संशोधन अहवाल कार्यवाही व मूल्यमापन सत्र ३ व सत्र ४...**

**टिप्पणी :** NEP 2020 च्या महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सत्र ३ मध्ये ४ श्रेयांक आणि सत्र ४ मध्ये ६ श्रेयांकाचे संशोधन कार्य अध्ययनार्थींनी करणे अनिवार्य आहे त्यातून अध्ययनार्थींमध्ये संशोधन वृत्ती विकसित होण्यासाठी कृतींची आवश्यकता आहे.त्याबाबतची मांडणी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद क्र.६० मध्ये मान्य झालेली आहे त्याबाबत ची कार्यवाही योजना पुढे दिलेली आहे ती मान्यतेसाठी सादर..

**विषय मान्यतेसाठी सादर:** एम.ए. शिक्षणशास्त्र M- 83 मधील संशोधन योजना सत्र ३ व सत्र ४ अहवाल कार्यवाही व मूल्यमापन चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**(सहपत्र ६)**

**निर्णय:-** एम.ए. शिक्षणशास्त्र M- 83 मधील संशोधन योजना सत्र ३ व सत्र ४ अहवाल कार्यवाही व मूल्यमापनास मान्यता देण्यात आली.

61.5 **विषय क्र. बी.-1 / एफ-180/ 2024/ 05 एम.ए.शिक्षणशास्त्र**

**विषय: एम.ए.शिक्षणशास्त्र M82 सन २०२२-२०२४ तुकडी संशोधन अहवाल परिशीलन करणेबाबत.**

**टिप्पणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद क्रमांक ६० मध्ये विषय क्रमांक ६०.४ नुसार संशोधन अहवाल परिशीलन कार्यवाही योजनेस कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली होती. परिशीलन समितीसाठी मार्गदर्शक सूचना परिशीलन दुरुस्तीपत्रक विकसित करण्यात आलेले होते. त्यानुसार परिशीलनबाबत २१ जून रोजी पथदर्शी अभ्यास करून २२ जून पासून परिशीलनाचे कार्य सुरु करण्यात आले. दि. २८/०६/२०२४ पर्यंत १८०० संशोधन अहवालांचे परिशीलन करण्यात आले. शिक्षणशास्त्र विद्याशाखा प्रतिनिधी, विद्यापीठातील प्राध्यापक, शैक्षणिक संयोजक आणि अभ्यासकेंद्रावरील स्वेच्छेने येणाऱ्या अनुभवी तज्ज्ञांना अभ्यासकेंद्र प्रतिनिधी म्हणून घेण्यात आले. सर्व संशोधन अहवालांचे मास्किंग करून कोडींग प्रणालीचा वापर करून
'O' श्रेणीतील सर्व संशोधन अहवाल, 'A' श्रेणीतील १०% संशोधन अहवाल, 'B' श्रेणीतील १०% संशोधन अहवाल, अनुत्तीर्ण १००% संशोधन अहवाल, परिशीलनासाठी देण्यात आले.दि 21 जून २०२४ आणि दि. २२ जून २०२४ रोजी समिती
परिशीलन समिती सदस्यांच्या निरीक्षणाचे एकत्रीकरण सर्वानुमते करण्यात आलेले आहे. ते पुढीलप्रमाणे मान्यतेसाठी सादर.

१) संशोधन अहवाल इतर विद्यापीठात यापूर्वी सादर झाले आणि शोधगंगावर उपलब्ध आहे.
२) संपूर्ण संशोधन अहवाल साम्य (इयत्ता,विषय आणि स्थळ बदल.)
३) पूर्वी सादर झालेल्या संशोधन अहवाल पूर्वीचा नमुना निवड आणि संशोधन कार्यवाहीच्या तारखा पूर्वीच्याच प्रमाणे सादर.
४) इतर विद्यापीठातील सादर काही ठिकाणी न्यादर्श आणि साधनात पूर्वीच्या नोंदी.
५) प्रकरण तीन साम्य जनसंख्या व नमुना निवड बदलण्यात आले.
६) प्रकरण २,३,४ मध्ये अशंतः/पूर्णतः साम्य
७) विद्यापीठाने निर्धारित केलेल्या प्रकरण योजनेची मांडणी न करता वेगळ्या शीर्षकाने मांडणी ३५-४० पानांचा संशोधन अहवाल आहे.प्रकरणे २-३ पानांची आहेत.
८) संपूर्ण संशोधन अहवालातील अक्षरांचा आकार एकसमान नाही. अनावश्यक रिकामी जागा सोडलेली आहे.
९) परिशीलन समितीने दुरुस्त्या सुचविलेल्या आहेत.

निरीक्षण क्र. १,२,३ ह्या पैकी कॉपी केसेस असल्यामुळे ते संशोधन अहवाल परीक्षा मंडळाकडे पुढील कार्यवाहीसाठी देण्यास चर्चा व मान्यतेसाठी सादर

निरीक्षण क्र. ४,५,६,७,८, विद्यापीठाने दिलेल्या सूचनांनुसार सोबत संशोधन अहवाल अभ्यासकेंद्राकडे पाठविण्यात येतील. हे संशोधन अहवाल ऑगस्ट अखेरपर्यंत अभ्यासकेंद्रावर सादर करणे. अभ्यासकेंद्रावर त्याची पुनरतपासणी व मौखिक परीक्षा घेऊन गुणदान व सुधारित संशोधन अहवाल विद्यार्थी संशोधन मार्गदर्शक आणि अभ्यासकेंद्र समन्वयक, केंद्र प्रमुख ह्यांच्या सही शिक्क्यासह शिक्षणशास्त्र विद्याशाखेत येतील. त्यानंतर विद्याशाखेमार्फत गुण परीक्षा विभागाला देण्यात येतील. सप्टेंबर पर्यंत ज्या केंद्रांचे गुण परीक्षा विभागाला प्राप्त होतील त्यांचा निकाल जून २०२४ परीक्षेच्या पुरवणी निकाल म्हणून जाहीर करण्यात येईल.

ज्या अध्ययनार्थीचे संशोधन अहवाल नाकारण्यात आलेले आहेत. कॉपी केसबाबत मा.कुलगुरूंचे आणि परीक्षा नियंत्रक मार्गदर्शन घेण्यात आले त्यांनी विद्यार्थ्यांनी पुन्हा नव्याने विषय निवडून संशोधन आराखडा सादर करून त्यानंतर अभ्यासकेंद्रावर कार्य करून सहा महिन्यात तो सादर करावा. त्यांना डिसेंबर/जानेवारी परीक्षा अर्ज सशुल्क पुन्हा भरावा लागेल. त्याचप्रमाणे विद्यापीठ पुनरमुल्यांकन शुल्क रु.१,००० भरण्यास परीक्षा मंडळ जो निर्णय घेईल त्यानुसार कार्यवाही करण्यास्तव मान्यतेसाठी सादर.

ज्या अध्ययनार्थीचे संशोधन अहवाल परिशीलन समितीने स्वीकारलेले आहे त्यांना ७५ गुण दिलेले आहे ते ५० मध्ये रुपांतरीत करून ५० पैकी मौखिक परीक्षेला मिळालेले गुण ग्राह्य धरण्यास चर्चा व मान्यतेसाठी सादर

**विषय मान्यतेसाठी सादर:** संशोधन अहवाल परिशीलन समितीसाठी विकसित केलेल्या मार्गदर्शक सूचना मान्यता द्यावी. एम.ए.शिक्षणशास्त्र M-82 संशोधन अहवाल परिशीलण समितीने केलेल्या कार्यास मान्यता द्यावी. निरीक्षण १,२,३ संशोधन अहवाल परीक्षा मंडळाकडे देण्यास मान्यता द्यावी. निरक्षण ४,५,६,७,८,९ संशोधन अहवालात दुरुस्त्या करण्यासाठी ते अभ्यासकेंद्राकडे पाठविण्यास चर्चा व मान्यतेसाठी सादर

**(सहपत्र ७)**

**निर्णय:-** संशोधन अहवाल परिशीलन समितीसाठी विकसित केलेल्या मार्गदर्शक सूचना व एम.ए.शिक्षणशास्त्र M-82 संशोधन आहवाल परिशील समितीने केलेल्या कार्यास तसेच निरीक्षण १,२,३ संशोधन अहवाल परीक्षा मंडळाकडे देण्यास आणि निरक्षण ४,५,६,७,८,९ संशोधन अहवालात दुरुस्त्या करण्यास मान्यता देण्यात आली व plagiarism शोधण्यासाठी योजना तयार करण्यात यावी असे सदस्यांनी सुचविले.

61.6 **विषय क्र. बी.-1 / एफ-180/ 2024/ 06**

**बी.एड. शिक्षणक्रमाला Craft Teacher Course (CTC) हा शिक्षणक्रम पूर्ण झालेल्या व्यक्तींना बी.एड. शिक्षणक्रमास प्रवेश देणेबाबत...**

**टिप्पणी :-** बी.एड. शिक्षणक्रमासाठी Craft Teacher Course (CTC) झालेल्या सेवांतर्गत शिक्षकांना प्रवेश देण्यासाठी मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी ज्ञानोबा गोविंदराव नागरगोजे यांच्या केस क्र. ५५१२ च्या २०१८ च्या संदर्भात दिलेल्या निर्णयानुसार ज्ञानोबा गोविंदराव नागरगोजे यांची पात्रता CTC शिक्षणक्रम असली तरी, त्यांना बी.एड. शिक्षणक्रमाच्या प्रवेश नियमातील नियम क्रमांक १ नुसार प्रवेश यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ मार्फत कार्यान्वित असलेल्या बी.एड. शिक्षणक्रमास प्रवेश देण्यास सांगितले होते. त्यानुसार यशंवतराव

| | |
|---|---|
| | ...चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ मार्फत कार्यान्वित असलेल्या बी.एड. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी CTC झालेल्या व्यक्तींना प्रवेश देण्यासाठी ऑनलाईन प्रवेश देण्याची तरतूद बी, एड. प्रवेश प्रक्रियेच्या सॉफ्टवेअर मध्ये करण्यात आली होती. मा. कुलसचिवांच्या मार्गदर्शनानुसार कोर्टाच्या निकालाचा प्रत्येक सदस्याने बारकाईने अभ्यास करून, पुढील निर्णय घेण्यात आलेला आहे. <br><br> **विषय मान्यतेसाठी सादर:** CTC प्रवेशाबाबतचा मा. न्यायालयाचा निर्णय हा वैयक्तिक श्री. ज्ञानोबा गोविदराव नागरगोजे यांच्या पुरताच होता. तो सर्वांना लागू करता येणार नाही. त्यामुळे बी.एड. प्रवेश सॉफ्टवेअरमध्ये CTC झालेल्या व्यक्तींना प्रवेश देण्यासाठी समाविष्ट करण्यात आलेली माहिती काढून टाकण्यात यावी. तसेच बी.एड. प्रवेश हे NCTE च्या प्रवेश नियमावलीतील मुद्दा क्र.१ नुसार डी.एड. आणि सेवांतर्गत असणाऱ्या उमेदवारास पात्र करण्यात यावे. **(सहपत्र ८)** <br><br> **निर्णय:-** CTC प्रवेशाबाबतचा मा. न्यायालयाचा निर्णय हा वैयक्तिक श्री. ज्ञानोबा गोविंदराव नागरगोजे यांच्या पुरताच होता. तो सर्वांना लागू करता येणार नाही. त्यामुळे बी.एड. प्रवेश सॉफ्टवेअरमध्ये CTC झालेल्या व्यक्तींना प्रवेश देण्यासाठी समाविष्ट करण्यात आलेली माहिती काढून टाकण्यात यावी. तसेच बी.एड. प्रवेश हे NCTE च्या प्रवेश नियमावतील मुद्दा क्र.१ नुसार डी.एड. आणि सेवांतर्गत असणाऱ्या उमेदवारास पात्र करण्यास मान्यता देण्यात आली. |
| 61.7 | **विषय क्र. बी.-1 / एफ-180 / 2024/07 बी.एड.विशेष शिक्षण शिक्षणक्रम सन २०२४-२६** <br> **उप विषय 61.7.1: बी.एड.विशेष शिक्षण शिक्षणक्रम सन २०२४-२६ पासून शिक्षणक्रम प्रवेश नियम...** <br> **टिप्पणी :** विद्यापीठात बी.एड.विशेष शिक्षणक्रम सन २०१५ पासून कार्यान्वित केला जातो. RCI सन २०२१ च्या नियमावलीनुसार (परिशिष्ट-१) सन २०२४-२६ च्या तुकडीसाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र.६० मध्ये ऑनलाईन प्रवेश पूर्व परीक्षा घेण्यासाठी मान्यता घेण्यात आली होती (परिशिष्ट-2). तरी याबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी दि. २८/०५/२०२४ रोजी शिक्षणशास्त्र विद्याशाखेमध्ये बैठक घेण्यात आली होती. ह्या बैठकीमध्ये मा.परीक्षा नियंत्रक यांच्या मार्गदर्शनाखाली सविस्तर चर्चा केली असता ऑनलाईन प्रवेश पूर्व परीक्षा घेण्यासाठी काही अडचणी येऊ शकतात. म्हणून प्रवेश पूर्व परीक्षा घेण्याऐवजी ५० गुणांची मुलाखत घेऊन प्रवेश प्रक्रिया कार्यान्वित करण्यात यावी (परिशिष्ट-3 ). तरी सोबत प्रवेश प्रक्रियेचे आणि मुलाखतीचे निकष सोबत जोडण्यात आले आहे. सदर विषय चर्चेसाठी व मान्यतेसाठी सादर... <br> **विषय मान्यतेसाठी सादर :** बी.एड विशेष शिक्षण शिक्षणक्रम सन २०२४-२०२६ प्रवेशपूर्व परीक्षा घेण्याऐवजी ५० गुणांची मुलाखत घेण्यास चर्चा व मान्यतेसाठी सादर.... <br><br> **(सहपत्र ९)** <br> **निर्णय:-** बी.एड विशेष शिक्षण शिक्षणक्रम सन २०२४-२०२६ प्रवेशपूर्व परीक्षा घेण्याऐवजी ५० गुणांची मुलाखत घेण्यास मान्यता देण्यात आली. |
| | **उप विषय 61,7.2:- विद्यापीठाच्या विभागीय केंद्रावर आणि नाशिक येथे नॅब केंद्रात बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचे नवीन अभ्यासकेंद्र कार्यान्वित करणेबाबत...** |

**टिप्पणी :** बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचे (P-21) महाराष्ट्रात सहा अभ्यासकेंद्र कार्यान्वित आहेत. त्यापैकी बौद्धिक अक्षमता प्रवर्गाचे एकच अभ्यासकेंद्र कार्यान्वित आहे. सन २०२३-२६ प्रवर्गासाठी ५० जागांसाठी ३१० इतके प्रवेश अर्ज प्राप्त झाले होते. बौद्धिक अक्षमता प्रवर्गाच्या शिक्षणक्रमासाठी विद्यार्थ्यांची मागणी जास्त दिसते.

RCI सोबत दि. ०६/०४/२०२३ रोजी झालेल्या ऑनलाईन बैठकीमध्ये याविषयी चर्चा करण्यात आली होती. RCI यांच्या मार्गदर्शकानुसार विद्यापीठाच्या मुख्यालयात तसेच विभागीय केंद्रावर अभ्यासकेंद्र कार्यान्वित करू शकतात असे सुचविले. प्रात्याक्षिक कार्य पूर्ण करण्यासाठी संबधित प्रवर्गाच्या शाळांसोबत सामंजस्य करार करून नवीन अभ्यासकेंद्र कार्यान्वित करू शकतात. त्यामुळे दि. २१/०६/२०२४ रोजी विद्यापीठाच्या मुंबई विभागीय केंद्र, पुणे विभागीय केंद्र, नांदेड विभागीय केंद्र, नागपूर विभागीय केंद्र, छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्र, या विभागीय केंद्र संचालकांसोबत ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली होती. (बैठकीचे ईतिवृत्त) मुंबई, पुणे, नांदेड, छत्रपती संभाजीनगर या विभागीय केंद्रांनी बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र कार्यान्वित करण्यासाठी संकारात्मक प्रतिसाद दिला. तरी सदर मुंबई, पुणे, नांदेड या विभागीय केंद्रांनी बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र कार्यान्वित करावयाचे आहे.

भारतीय पुनर्वास परिषदेने य.च.म. मुक्त विद्यापीठात बी.एड. विशेष शिक्षण (दृष्टीबाधिता) या शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्रा कार्यान्वित करण्यास ना हरकत प्रमाणपत्र (NOC) दिलेली आहे. या अभ्यासकेंद्रासाठी नॅब या संस्थेसोबत सामंजस्य करार करून सदर अभ्यासकेंद्र नॅब या संस्थेमार्फत कार्यान्वित करावयाचे आहे. दृष्टीबाधितांसाठी ही राष्ट्रीय पातळीवर मार्गदर्शनाचे कार्य करते. या संस्थेने बी.एड. विशेष शिक्षण VI हा शिक्षणक्रम यापुर्वी हा राबविला आहे. त्यांच्या समवेत दि. 21 जून२०२४ रोजी बैठक घेण्यात आलेली आहे. बी.एड. विशेष शिक्षण VI चे प्रवेश दिव्यांगअध्ययन केंद्रांतर्गत करण्यात येतील RCI ला सदर अभ्यासकेंद्र शिक्षणशास्त्र विद्याशाखेंतर्गत आहे असे दाखविण्यात येईल. परंतु प्रत्यक्षात अभ्यासकेंद्राचे कार्य नॅब या संस्थेत करण्यात येईल. सदर विषय विद्याशाखा परिषदे समोर चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**विषय मान्यतेसाठी सादर:** विद्यापीठाच्या विभागीय केंद्रावर बी.एड. विशेष शिक्षण (ID) शिक्षणक्रमाचे नवीन अभ्यासकेंद्र कार्यान्वित करण्यास आणि नॅब नाशिक येथे बी.एड. विशेष शिक्षण (VI) कार्यान्वित करण्यास चर्चा व मान्यतेसाठी सादर

**(सहपत्र १०)**

**निर्णय:-** विद्यापीठाच्या विभागीय केंद्रावर आणि नॅब नाशिक येथे बी.एड. विशेष शिक्षण(VI) शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र सुरु करण्यासाठी तत्वतः मान्यता देण्यात आली. अभ्यासकेंद्रा सुरु करण्यापूर्वी त्याबाबतची सविस्तर कार्यवाही योजना विकसित करण्यात यावी व त्यास मा. कुलगुरूंची मान्यता घेण्यात यावी असे समिती सदस्यांनी सूचित केले.

**उप विषय 61.7.3:- बी.एड. विशेष शिक्षण प्रवेश प्रक्रिया मुलाखत समिती सदस्यांना मानधन देणे बाबत...**

**टिप्पणी :** भारतीय पुनर्वास परिषद नवी दिल्ली (RCI) यांच्या कडून सन २०२१ च्या नवीन नियमावली नुसार सन २०२४-२६ च्या तुकडीसाठी प्रवेश पूर्व उमेदवारांची मुलाखत घेतली जाणार नाही. बी.एड.विशेष शिक्षणक्रमात उमेदवारांची प्रवेश पूर्व मुलाखत ही५० गुणांसाठी घेतली जाणार

आहे. मुलाखत घेण्यासाठी समिती गठीत केली जाणार आहे. समितीचे स्वरूप खालीलप्रमाणे असणार आहे.

१. समिती अध्यक्ष : CDS प्रतिनिधी
२. समिती सदस्य : विद्यापीठ प्रतिनिधी
३. समिती सहायक : एक व्यक्ती

मुलाखत घेण्यासाठी किमान ३ व्यक्तींची आवश्यकता आहे. संबंधित समिती सदस्यांना मानधन द्यावे. मानधनाबाबतचा तपशील सहपत्र मध्ये जोडला आहे. सदर विषय विद्याशाखा परिषदे समोर चर्चेसाठी व मान्यतेसाठी सादर...

**विषय मान्यतेसाठी सादर.** बी.एड प्रवेश मुलाखत समिती सदस्यांना सहपत्रात दिलेल्या नुसार मानधन देण्यास चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**(सहपत्र ११)**

**निर्णय:-** बी.एड. प्रवेश मुलाखत समिती सदस्यांना सहपत्रात दिलेल्या नुसार मानधनास मान्यता देण्यात आली.

**उप विषय 61.7.4:- नवीन शिक्षणक्रम विकसित करणेबाबत...**

**टिप्पणी :** समाजात दिव्यांग व्यक्तींचे प्रमाण हे झपाट्याने वाढताना दिसून येत आहे. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, व्यावसायिक गरजा लक्षात घेता, सध्याच्या युगात अशा व्यक्तींना समाजात सहज समायोजन करणे तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सहज शक्य आहे. एकविसाव्या शतकात तंत्रज्ञानाने इतकी प्रगती केली आहे की, कोणत्याही प्रकारच्या दिव्यांग व्यक्तीला कार्य करणे सहज शक्य आहे. दिव्यांगांच्या कार्यात सहजता सुगम्यता आणण्यासाठी तंत्रज्ञान वरदान आहे. मात्र त्यांच्यासाठी असलेल्या तंत्रज्ञानाबदल समाजात जागरूकतेचे प्रमाण हे खूप कमी आहे. मा. कुलगुरूंनी विद्यापीठाद्वारे **"दिव्यांगजनासाठी सहाय्यक तंत्रज्ञान प्रमाणपत्र शिक्षणक्रम"** (Certificate Program In Assistive Technology For Divyangjan) हा शिक्षणक्रम कार्यान्वित करण्यासाठी सुचविले आहे. तरी सदर विषय विद्याशाखा परिषदेसमोर चर्चासाठी व मान्यतेसाठी सादर....

**विषय मान्यतेसाठी सादर:** दिव्यांग अध्ययनकेंद्रा तर्फे (Certificate Program In Assistive Technology For Divyangjan) नवीन शिक्षणक्रम सुरु करण्याबाबत चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**निर्णय:-** दिव्यांग अध्ययनकेंद्रा तर्फे (Certificate Program In Assistive Technology For Divyangjan) नवीन शिक्षणक्रम सुरु करण्याबाबत मान्यता देण्यात आली.

61.8 **विषय क्र. बी.-1 / एफ-180 / 2024/08**

**विषय: शालेय व्यवस्थापन पदविका व एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमासाठी प्राश्निक/ मूल्यमापकांच्या नावास मान्यता मिळणेबाबत.**

**टिप्पणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत शालेय व्यवस्थापन पदविका व एम.ए. शिक्षणशास्त्र हे शिक्षणक्रम कार्यान्वित आहेत, सदर शिक्षणक्रमाच्या मूल्यमापन कार्यासाठी मूल्यमापक व प्राश्निकांची मूल्यमापन विभागास आवश्यकता असते. विविध अभ्यासकेंद्रावरून पत्राद्वारे प्राप्त

School of Education

झालेल्या प्राश्निक व मूल्यमापकांच्या सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे असलेल्या प्राश्निकांच्या व मूल्यमापकांच्या नावास मान्यतेसाठी विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**विषय मान्यतेसाठी सादर**: शालेय व्यवस्थापन पदविका, एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रांनी कळविलेल्या अभ्यासक्रम निहाय संमंत्रकांना प्राश्निक, परीक्षक समीक्षक म्हणून कार्य करण्यास चर्चा व मान्यतेसाठी सादर....

**(सहपत्र १२)**

**निर्णय:-** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रावरील संमंत्रकांना प्राश्निक परीक्षक, परीक्षक समीक्षक म्हणून कार्य करण्यात मान्यता देण्यात आली.

61.9 **विषय क्र. बी.-1 / एफ-180 / 2024/09 बालसंगोपन प्रमाणपत्र शिक्षणक्रम**

**विषय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे बालसंगोपन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या NEP 2020 च्या मार्गदर्शक तत्वानुसार NCERT आणि SCERT पाठ्यक्रमाशी पडताळणी करणेबाबत...

**टिप्पणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे बालसंगोपन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या NEP 2020 पूर्वी पुनर्रचित कार्य हाती घेण्यात आलेले आहे. NEP 2020 च्या मार्गदर्शक तत्वानुसार NCERT आणि SCERT पाठ्यक्रम विकसित केलेला आहे. या पाठ्यक्रमातील सर्व घटकांचा समावेश विद्यापीठाच्या बालसंगोपन प्रमाणपत्र शिक्षणक्रमात झालेला आहे का ह्याची पडताळणी करण्यासाठी समिती गठीत करण्यास मान्यता द्यावी. या समितीत श्रीमती सुषमा पाध्ये, श्रीमती भारती पाटील, प्रोफेसर डॉ. संजीवनी महाले, डॉ. दयाराम पवार, श्रीमती वृषाली देहाडराय,श्री. जगदीश इंदलकर, श्रीमती मंजिरी निमकर.

**विषय मान्यतेसाठी सादर:-** बालसंगोपन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या NEP 2020 च्या मार्गदर्शक तत्वानुसार NCERT आणि SCERT पाठ्यक्रम foundation विकसित झाले असून या पाठ्यक्रमातील सर्व घटकांची पडताळणी करण्यासाठी सदस्यांच्या नावास चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**निर्णय:-** NEP 2020 नुसार foundation stage च्या मार्गदर्शक तत्वानुसार NCERT आणि SCERT पाठ्यक्रम विकसित केलेला आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखेने विकसित केलेल्या बालसंगोपन प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या पाठ्यक्रम पडताळणी करण्यासाठी वरील समिती सदस्यांच्या नावांना मान्यता देण्यात आली.

61.10 **विषय क्र. बी.-1 / एफ-180 / 2024/ 10**

**विषय :-** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या नवीन लेखकांच्या नावास मान्यता मिळणेबाबत.

**टिप्पणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम कार्यान्वित आहे. सदर शिक्षणक्रमाचे लेखन कार्य विद्याशाखेत सुरू आहेत. शिक्षणक्रमातील काही अभ्यासक्रमाचे लेखन कार्य लेखकांकडून अद्याप प्राप्त झाले नाही. त्यामुळे ते लेखन कार्य करून घेण्यासाठी सोबत जोडलेल्या नवीन लेखकांच्या नावास मान्यतेसाठी विषय चर्चा व मान्यतेसाठी सादर.

**(सहपत्र १३)**

**विषय मान्यतेसाठी सादर :-** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या नवीन लेखकांच्या नावास मान्यता मिळण्यास चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**निर्णय:-** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या नवीन लेखकांच्या नावास मान्यता मिळण्यास मान्यता देण्यात आली.आणि आवश्यकतेनुसार नवीन लेखकांची गरज भासल्यास त्याचे अधिकार संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना देण्यात आले.

61.11 **विषय क्र. बी.-1 / एफ-180 / 2024/ 11**

**विषय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखे अंतर्गत अभ्यासकेंद्र मानधन शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालकांच्या सहीने कार्यवाही करणे बाबत....

**टिप्पणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेत एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र चालविण्यात येते त्याच प्रमाणे दिव्यांग अध्ययन केंद्रातर्फे बी.एड. विशेष शिक्षण HI,VI,ID अभ्यासकेंद्र चालविण्यात येते. विद्यापीठाच्या सन २०२३ धोरणात्मक निर्णयाप्रमाणे विद्यापीठ शुल्क आणि अभ्याकेंद्र शुल्क विद्यापीठात जमा केले जाते. त्या त्या अभ्यासकेंद्रांना वित्त विभागातून मानधन दिले जाते.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत चालविण्यात येणारे एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र, दिव्यांग अध्ययन केंद्रा संदर्भात नॅ ब(NAB) आणि इतर विभागीय केंद्रावर नव्याने अभ्यासकेंद्र सुरु केल्यानंतर विद्यापीठ नियमानुसार जो काही खर्च करण्यात येईल त्याची बीले नॅ ब (NAB), विभागीय केंद्रामार्फत शिक्षणशास्त्र विद्याशाखेस प्राप्त होतील. शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालकांच्या मान्यते ती बीले वित्त विभागामार्फत संबंधित व्यक्तीला online पद्धतीने पाठविण्यात येतील. यासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या नवीन लेखा शीर्ष अंतर्गत जमा व खर्चाची नोंद करण्यासाठी नवीन लेखा शीर्ष तयार करण्यात येईल.

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर :** शिक्षणशास्त्र विद्याशाखे अंतर्गत एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम आणि बी.एड. विशेष शिक्षण, नॅ ब(NAB) तर्फे बी.एड. विशेष शिक्षण (VI) आणि विभागीय केंद्र मुंबई, नांदेड, पुणे, छ. संभाजीनगर बी.एड. विशेष शिक्षण (ID) राबविण्यास आणि शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत मानधन अदा करण्यास मान्यता द्यावी.

**निर्णय:-** शिक्षणशास्त्र विद्याशाखे अंतर्गत एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम आणि बी.एड. विशेष शिक्षण, नॅब(NAB) तर्फे बी.एड. विशेष शिक्षण (VI) आणि विभागीय केंद्र मुंबई, नांदेड, पुणे,छ. संभाजीनगर बी.एड. विशेष शिक्षण (ID) राबविण्यास आणि शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत मानधन अदा करण्यास मान्यता देण्यात आली.

61.12 **विषय क्र. बी.-1 / एफ-180 / 2024/ 12**

**विषय:** शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मानसशास्त्रीय प्रयोगशाळा विकसन करणे बाबत ...

**टिप्पणी:** शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद ६०.१७.१ शिक्षणशास्त्र आणि मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे यांच्या संयुक्त विद्यमाने मानसशास्त्रीय प्रयोगशाळेत मान्यता देण्यात आली आणि या बैठकीच्या इतिवृत्तास दि.२८ मे २०२४ रोजी झालेल्या विद्वत परिषदेत ६३.३.१२ या विषयान्वये या बैठकीला मान्यता देण्यात आलेली आहे आणि सदरील विषय वित्त समिती पुढे ठेवण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत एम.ए., बी.ए., विशेष शिक्षण

आणि मानवविद्या व सामाजिक विद्याशाखेतील बी.ए. आणि एम.ए. मानसशास्त्र विद्यार्थ्यांना प्रयोग करताना या प्रयोगशाळेचा वापर करता येईल. यासाठी येणारा खर्च पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| • बांधकाम खर्च | - ३० लाख रुपये, |
| • मानसशास्त्रीय चाचण्या व उपकरणे खरेदी करणेबाबत खर्च | - ५ लाख रुपये, |
| • तज्ञांना आमंत्रित करणेबाबत खर्च | - १.५ लाख रुपये, |
| • भौतिक सुविधा खर्चाबाबत खर्च | - ५ लाख रुपये, |
| • चाचण्या प्रमानिकरण करण्यासाठी खर्च | - ५ लाख रुपये |
| एकुण | - ४६.५ लाख रुपये |

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर :** शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मानसशास्त्रीय प्रयोगशाळा विकसनास चर्चा व मान्यतेसाठी सादर......

**(सहपत्र १४)**

**निर्णय:-** शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मानसशास्त्रीय प्रयोगशाळा विकसनास मान्यता देण्यात आली आणि त्यासाठी सन २०२४ -२५ या वित्तीय वर्षातील खर्च रु. ४६ लाख ५० हजार रुपये खर्च करण्यास मान्यता देण्यात आली.

61.13 **विषय क्र. बी.-1 / एफ-180 / 2024/13**

**ऐनवेळीचे विषय . 61.13.1:- शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि SIOS यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता १० वी आणि १२ वी साठी कार्य करणेबाबत...**

**टिप्पणी :** National Curriculum Framework (NCrF) च्या आधारे शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि महाराष्ट्र मुक्त शाळा (SIOS) यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता दहावी व इयत्ता बारावी उत्तीर्ण न झालेल्या अध्ययनार्थीसाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी SIOS एस.एस.सी व एच.एस.सी बोर्ड महाराष्ट्र राज्य समावेत दि. २५ एप्रिल २०२४ ऑनलाईन आणि दि. ०६ मे २०२४ रोजी प्रत्यक्ष बैठक पुणे येथे घेण्यात आलेली आहे. त्यात NIOS धर्तीवर हे कार्य सुरु करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला. NIOS न्यू दिल्ली येथील तज्ज्ञ मार्गदर्शनानुसार जुलै 2024 मध्ये कार्यशाळा घेण्यात येणार आहे.

**(सहपत्र १५)**

**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**

शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि राज्य मुक्त शाळा संस्था (SIOS) शिक्षणशास्त्र विद्याशाखे संयुक्त विद्यमाने इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी अनुतीर्ण प्रवेशार्थीसाठी योजना विकसनाबाबत चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**निर्णय:-** शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि राज्य मुक्त शाळा संस्था (SIOS) शिक्षणशास्त्र विद्याशाखे संयुक्त विद्यमाने इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी अनुतीर्ण प्रवेशार्थीसाठी योजना विकसनाबाबत मान्यता देण्यात आली.

**उपविषय** . 61.13.2: संप्रेषणात्मक इंग्रजी प्रमाणपत्र शिक्षणक्रम राबविणेबाबत....

| | |
|---|---|
| | **टिप्पणी :** कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात संप्रेषणात्मक इंग्रजी प्रमाणपत्र शिक्षणक्रम राबविणेबाबत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे ह्यांच्याकडे इंग्लिश स्पिकिंग या कोर्स बाबत प्रस्ताव दि. १३ एप्रिल २०२३ रोजी पाठवण्यात आलेला होता. त्यास एससीईआरटीच्या गाभा समितीने मान्यता दिलेली आहे जा. क्र. राशैसंप्रपम/ सा.शा./२०२४/२५/२०२४१५ दि. १६ मे २०२४ पत्रान्वये आर्थिक प्रस्ताव व सादर करण्याबाबत विद्यापीठाला कळविण्यात आलेले आहे. या प्रकल्पाचा आराखडा आणि आर्थिक अंदाजपत्रक एससीईआरटीला सादर करण्यात आलेले आहे. सध्या हा प्रकल्प नासिक जिल्ह्यातील पेठ आणि इगतपुरी येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात इयत्ता सहावी ते आठवी आणि इयत्ता नववी ते बारावी विद्यार्थिनी आणि त्यांच्या शिक्षकांसाठी राबविण्यात येणार आहे.<br><br>**प्रस्ताव मान्यतेसाठी सादर**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे एससीईआरटीने मान्यता दिलेले संप्रेषणात्मक इंग्रजी प्रमाणपत्र शिक्षणक्रम राबविण्यात चर्चा व मान्यतेसाठी सादर.....<br><br>**निर्णय:-** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतर्फे एससीईआरटीने मान्यता दिलेले संप्रेषणात्मक इंग्रजी प्रमाणपत्र शिक्षणक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आली.<br><br>**(सहपत्र १६)** |

शेवटी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

प्रा. विजयकुमार पाईकराव
सचिव, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

प्रा. संजीवनी महाले
अध्यक्ष, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

मान्य

मान्य/ अमान्य 3/7/24

**मा. कुलगुरू ह्यांचे मान्यतेसाठी सविनय सादर.............**

School Council Education